# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १२४-२३ दिनांक :- १४/०४/२०२३

## वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त करणा-या पिडीत मुलीच्या आई व भावावर कारवाई करुन पिडीत मुलीची सुटका - अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर व नवघर पोलीस ठाणेची संयुक्तिक कारवाई.

. दिनांक १२/०४/२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना गोपनीय माहिती प्राप्त झाली कि, पिडीत मुलीस तिची आई व भाऊ असे मिळुन तिचे मनाविरुध्द बळजबरीने पैशासाठी वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडत आहेत. तसेच तिला तिचे मनाविरुध्द बाहेर देशात वेश्यागमनाकरीता पाठविणार आहेत. तिला मदतीची आवश्यकता आहे.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदरचे पो.नि. श्री. समीर अहिरराव व स्टाफ यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन नवघर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. सुशिलकुमार शिंदे, पो.हवा. शशिकांत भोईर यांना सदर मिळालेल्या माहितीचा आशय कळवून त्यांना सोबत घेवून एन.जी.ओ.चे पदाधिकारी व दोन पंचासह ओम शांती चौक जवळ, नवघर भाईंदर पूर्व या ठिकाणी १६.०५ वा. छापा कारवाई करुन पिडीत मुलीचा भाऊ व आई यांना ताब्यात घेवुन चौकशी केली असता पिडीत मुलगी हिस तिची आई व भाऊ हे आर्केस्ट्रा बारचे नावाखाली बाहेर देशात दलालामार्फत पाठविणार आहे व त्याबदल्यात वेश्यागमनाचा मोबदला म्हणुन रोख रक्कमेच्या स्वरुपात वेळोवेळी स्विकारला असल्याचे निदर्शनास आले. तसेच पिडीत मुलीने वेश्यागमनाकरीता परदेशात जाण्याकरीता नकार देत असल्याने तिस मारहाण व शिवीगाळ केल्याचे पंचा समक्ष निष्पन्न झाल्याने पिडीत महिलेची आई व भाऊ यांचे विरुध्द नवघर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. २६३/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७०, ३२३, ५०४, ३४, सह अ.व्या.प्रति.अधि. कलम ४,५, सह. बाल अधिनियम कलम ७५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास नवघर पोलीस ठाणे करीत आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुर पोलीस उप आयुक्त (गुन्हे) , श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक कक्ष, भाईंदरचे पो.नि.श्री. समीर अहिरराव, स.फौ. उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पो.अंम. केशव शिंदे, म.पो.अंम. अश्विनी भिलारे, चालक पो.हवा. सम्राट गावडे, महिला म.सु.ब. सोनाली मोरे तसेच नवघर पोलीस ठाण्याचे पो.नि. श्री. सुशिलकुमार शिंदे, पो.हवा. शशिकांत भोईर यांनी केली आहे.

----oooo----